




# अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका

फेब्रुवारी २०२४

वर्ष ४९ अंक ०२



मातृमंदिर आणि ऑरोविलच्या परिसराचे विहंगम दृश्य

# अभीप्सा

(ईश्वराप्रति असलेली आस)

**प्रकृती ती जड । करील उघड । ईश्वरी ते रूप । सुघटित ।।**

---

**प्रकाशक**

श्री. प्रदीप नारंग, पुडुचेरी

**प्रकाशन स्थळ**

श्रीअरविंद सोसायटी

सोसायटी हाऊस, ११ सेंट मार्टिन स्ट्रीट, पुडुचेरी – ६०५००१

**संपादक**

डॉ. केतकी मोडक, पुणे

भ्रमणध्वनी : ९४२१०१६०८९

ई–मेल : editorabhipsa2018@gmail.com

**मुद्रक**

सेन्थिल ऑण्डवर प्रेस, पुडुचेरी – ६०५००१


**चिंतनार्थ...**

सत्याचा शोध आणि सत्याप्रत पोहोचणे या गोष्टी आपापल्या मार्गाने मुक्तपणे अनुसरता येणे हा प्रत्येक मनुष्याचा अधिकार आहे. परंतु प्रत्येकाने हे जाणून असावे की, त्याला लागलेला शोध हा केवळ त्याच्यासाठी चांगला असतो; तो त्याने इतरांवर लादता कामा नये.

– श्रीमाताजी (CWM 13 : 207)

*

# ऑरोविल – एक वैश्विक नगरी

संपादकीय..........................................................०२
ऑरोविल – ईश्वरी स्वप्न..............................................०३
ऑरोविल – एक अभिनव प्रयोग.......................................२०
ऑरोविलची जडणघडण................................................२९

---

## संपादकीय

२८ फेब्रुवारी १९६८ रोजी ज्या 'उषानगरी'ची म्हणजे 'ऑरोविल'ची स्थापना श्रीमाताजींच्या हस्ते करण्यात आली त्यासंबंधी आजवर बरेचसे लिखाण प्रकाशित करण्यात आले आहे. ते लिखाण त्या त्या लेखकाला ऑरोविलबाबत जे आकलन झाले आहे त्यावर आधारित आहे. परंतु ऑरोविल ही नगरी कशाचे प्रतिनिधित्व करते आणि ही नगरी कशी असली पाहिजे असे श्रीमाताजींना वाटते, ते त्यांच्याच लिखाणातून आणि निकटवर्तीयांशी झालेल्या त्यांच्या संभाषणांच्या आधारे जाणून घेण्याचा प्रयत्न आपण येथे करणार आहोत.

श्रीमाताजींच्या दिव्य दृष्टीला जे भविष्यवेधी दर्शन घडले त्याचे एक मूर्त रूप म्हणजे ऑरोविल. त्या दर्शनास 'अभीप्सा' मासिकाचा हा अंक समर्पित करत आहोत.

संपादक, अभीप्सा मासिक

**

---

अभीप्सा मासिक हे श्रीअरविंद सोसायटी, पाँडिचेरीचे मुखपत्र आहे.

---

योगी श्रीअरविंद म्हणजे पूर्वाश्रमीचे क्रांतिकारक अरविंद घोष आणि श्रीमाताजी म्हणजे पूर्वाश्रमीच्या मीरा अल्फासा, (फ्रान्स). 'श्रीअरविंद आश्रम' हा भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पाँडिचेरी येथे आहे.

# ऑरोविल – ईश्वरी स्वप्न

(श्रीमाताजी म्हणतात की, आपण एका नव्या जगताच्या जन्माचे साक्षी आहोत. १९५६ साली श्रीमाताजींनी उद्‌घोषित केले की, ‘एक नवीन जग जन्माला आले आहे.’ त्या नव्या जगतामधून उदय पावणारी भावी अतिमानवता, ज्या पाळण्यामध्ये वृद्धिंगत व्हावी अशी श्रीमाताजींनी मनीषा आहे, ती ‘उषानगरी’ म्हणजे ऑरोविल. या ऑरोविलच्या संकल्पनेची, निर्मितीची, त्याच्या विकासाची कहाणी अतिशय रोचक आहे. या उषानगरीच्या सर्वेसर्वा होत्या श्रीमाताजी. बीजरूपात ती कल्पना स्फुरण्यापासून ते ‘मातृमंदिरा’च्या पायाभरणीपर्यंतचा ऑरोविलच्या घडणीचा सर्व प्रवास त्यांच्या अंतःचक्षुंच्या देखरेखीखाली झाला. ऑरोविलच्या विकसनाच्या प्रत्येक पावलाला सोबत आहे ती श्रीमाताजींची, त्यांच्या संदेशांची, त्यांच्या मार्गदर्शनाची. त्यामधूनच आकाराला आले ‘ईश्वरी स्वप्न’. ही सर्व कहाणी श्रीमाताजींच्याच शब्दांमध्ये, कालानुक्रमे समजावून घेण्याचा हा प्रयत्न असणार आहे. वाचकांना यामधून ऑरोविलच्या घडणीचे साक्षीदार झाल्याचा अनुभव येईल असा विश्वास वाटतो. – संपादक)

**प्रत्यक्षात उतरू पाहणारे स्वप्न**

या पृथ्वीवर असे एक स्थान असावे की, ज्यावर कोणतेच राष्ट्र स्वतःचा मालकी हक्क गाजवणार नाही. जिथे प्रामाणिक अभीप्सा (aspiration) बाळगणारी, शुभसंकल्प असणारी सर्व माणसं, या जगाचे नागरिक म्हणून मुक्त मनाने जीवन जगू शकतील. ते केवळ एकाचीच, म्हणजेच त्या परम सत्याचीच आज्ञा पाळतील. शांती, सलोखा, सुमेळ यांनी युक्त असे हे स्थान असेल जेथे, मनुष्यामधील संघर्षभावनेच्या सर्व प्रेरणा या मनुष्याच्या दुःखभोग व चिंता यांच्या मूळकारणांवर विजय मिळविण्यासाठीच उपयोगात आणल्या जातील; त्या प्रेरणा व्यक्तीची दुर्बलता आणि अज्ञान यांच्यावर मात करण्यासाठी उपयोगात आणल्या जातील. व्यक्तीच्या मर्यादा व अक्षमता यांना उल्लंघून जाण्यासाठी त्या

## ऑरोविलची सनद

१) 'ऑरोविल' ही कोणा एकाची मालमत्ता नव्हे. 'ऑरोविल' हे अखिल मानववंशासाठी आहे. पण येथे राहायचे असल्यास व्यक्ती ही 'दिव्य चेतने'ची स्वेच्छाभावी सेवक असणे आवश्यक आहे.

२) 'ऑरोविल' हे निरंतर चालणाऱ्या शिक्षणाचे, सातत्यपूर्ण प्रगतीचे आणि वार्धक्यविरहित तारुण्याचे स्थान असेल.

३) 'ऑरोविल' भूतकाळ आणि भविष्यकाळ यांतील सेतू बनण्याची मनीषा बाळगत आहे. आंतरिक आणि बाह्य शोधांचे लाभ घेत, 'ऑरोविल' भावी साक्षात्कारांच्या दिशेने धीटपणे झेपावेल.

४) 'ऑरोविल' हे खऱ्याखुऱ्या 'मानवी एकते'चे मूर्तरूप व्हावे या हेतुने केलेल्या भौतिक व आध्यात्मिक संशोधनांचे स्थान असेल.





# ऑरोविल आज...

'ऑरोविल' हे दक्षिण भारतामधील, तामिळनाडू आणि पाँडिचेरी या राज्यांमध्ये वसले आहे. चेन्नईच्या दक्षिणेस १५० किमी अंतरावर आणि पाँडिचेरी शहराच्या उत्तरेस १० किमी अंतरावर ऑरोविल वसलेले आहे.

ऑरोविलमध्ये आज ५९ देशांमधील, अगदी तान्ह्या बालकांपासून ते ८० वर्षे वयांपर्यंतच्या विविध वयोगटातील (सरासरी वय ३०), सर्व सामाजिक वर्गांमधील, विविध संस्कृती आणि पार्श्वभूमी असणारे, साऱ्या मानवतेचे प्रतिनिधित्व करणारे लोक राहतात. ऑरोविलमध्ये राहण्यासाठी येणाऱ्यांची संख्या सातत्याने वाढत आहे. सध्या ऑरोविल येथे सुमारे २५००-३००० रहिवासी आहेत.

विविधतेमध्ये मानवी एकता साकारणे हे ऑरोविलचे उद्दिष्ट आहे. ज्यामध्ये मानवी एकतेसाठी आणि चेतनेच्या रूपांतरणासाठी कार्य केले जात आहे, असा ऑरोविल हा आंतरराष्ट्रीय मान्यता असलेला पहिला आणि आजवरचा तरी एकमेव प्रयोग आहे. मानवजातीच्या शाश्वत जीवनासाठी आणि भावी सांस्कृतिक, पर्यावरणीय, सामाजिक आणि आध्यात्मिक आवश्यकतांवर येथे प्रत्यक्ष संशोधनाचे काम चालू असते.

**

नमस्कार वाचकहो,

अभीप्सा मासिकातील काही पाने आपल्या अवलोकनार्थ येथे देण्यात आली होती. आपल्याला ह्या अंकातील विषयावरील आणि यासारख्या इतर विषयांवरील श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांचे विचार मराठीत समजून घ्यावयाचे असतील तर, आपण अभीप्सा मासिकाचे वर्गणीदार व्हावे, ही विनंती.

वर्गणीचा तपशील शेजारील पानावर दिला आहे.

– संपादक, अभीप्सा मासिक

## मासिकाचे स्वरूप

श्रीअरविंदांचे बहुतांशी सारे साहित्य मुळात इंग्रजी व बंगाली भाषेत आहे. तर श्रीमाताजी यांचे बहुतांशी वाङ्मय फ्रेंच व इंग्रजी भाषेत आहे. हे दुर्मिळ विचारधन मराठीत आणण्याचे प्रयत्न 'अभीप्सा' या मासिकाच्या माध्यमातून अव्याहतपणे चालू आहेत. पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असलेल्या 'ऑल इंडिया मॅगेझिन' या इंग्रजी मासिकाची मराठी आवृत्ती म्हणजे 'अभीप्सा.' १९७६ पासून हे मासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे.

## वर्गणी व देणगीचा तपशील

वार्षिक वर्गणी : २०० रू. (१२ अंक)

तीन वर्षाचे दर : ५८० रू. (३६ अंक)

पाच वर्षांचे दर : ९६० रू. (६० अंक)

देणगीदार : ४००० रु.

(देणग्या 80 G अंतर्गत करसवलतीस पात्र आहेत.)

वर्गणी वा देणगीची रक्कम आपण ऑनलाईनदेखील भरू शकता.

## वर्गणी वा देणगी ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society

बँकेचे नाव : Central Bank of India

IFSC Code : CBIN0281354

A/C No. : 1235467709

*

**सूचना :** रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा ही विनंती; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

*

**मनिऑर्डरने वर्गणी पाठवायची असल्यास,** श्री. गोविंद पोतदार, श्रीअरविंद सोसायटी, मातोश्री आर्केड, सहकार भवन समोर, अमरावती, महाराष्ट्र – ४४४६०१ या पत्त्यावर पाठवावी. मनिऑर्डरमध्ये अभीप्सा मासिकाचा स्पष्ट उल्लेख करावा, ही विनंती.

*

वर्गणीदारांना काही कारणाने अंक उपलब्ध न झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करावा – श्री. गोविंद पोतदार ९३७३७२४५२०

# आंतरिक जीवन

(हुता हिंडोचा या साधिकेच्या माध्यमातून श्रीमाताजींनी श्रीअरविंद लिखित 'सावित्री' या महाकाव्याची चित्रे रेखाटून घेतली होती. हुता यांनी सांगितलेली एक आठवण...)

२८ जून १९६८ रोजी श्रीमाताजींनी सावित्रीमधील काही काव्यपंक्तींचे वाचन केले आणि त्याचे विवरण केले; मी ते ध्वनिमुद्रित करून घेतले. त्यानंतर त्यांनी मला त्यांच्या जवळ बसवून घेतले आणि मला ध्यान करण्यास सांगितले. मी डोळे मिटते न मिटते तोच, एक असीम शांती माझ्यामध्ये अवतरली आणि माझ्या सर्वांगाला तिने जणू लपेटून घेतले.

काही वेळाने श्रीमाताजींनी डोळे उघडले आणि माझ्याकडे हसून पाहत त्या म्हणाल्या, ''तुला मातृमंदिर परिसराच्या मध्यभागी असलेले ते वडाचे झाड माहीत आहे ना ? तिथे तू त्या झाडाखाली बसली आहेस आणि त्या झाडाच्या फांद्यांवरून खाली आलेल्या फुलांच्या माळा सर्वत्र तुझ्या आजूबाजूला हलत–डुलत आहेत, असे आत्ता मला ध्यानात दिसले. वरून तुझ्यावर फुलांचा वर्षावसुद्धा होत होता. आणि तू अगदी शांत होतीस.''

श्रीमाताजींचा तो दृष्टान्त मी चित्रामध्ये उतरविला. त्यांनी चित्रामध्ये मला काही किरकोळ फेरफार करायला सांगितले आणि त्यानुसार मी ते बदल केले. माझ्या चित्रामध्ये मी काही खारी, एक हरीण आणि ससासुद्धा काढलेला होता, ते सारे पाहून त्यांना आश्चर्य वाटले. ते चित्र पाहून त्या आनंदित झाल्या होत्या. काही काळ चित्त एकाग्र करून नंतर, त्यांनी एका कागदावर पुढील शब्द लिहिले – 'आंतरिक जीवन.' श्रीमाताजींनी आंतरिक जीवनाविषयी लिहिले होते की, ''व्यक्तीने एकदा आंतरिक जीवनाचे माधुर्य अनुभवले की नंतर मग तिचे इतर कशानेच समाधान होणार नाही.''

हिंदू परंपरेमध्ये वडाच्या झाडाला 'ज्ञानवृक्ष' असे म्हणतात. श्रीमाताजींनी या वृक्षाला 'ऐक्य' असे नाव दिले. या वृक्षाभोवती संगमरवरी आसनं असावीत आणि लोकांनी तिथे बसून शांतपणे ध्यान करावे, अशी इच्छा श्रीमाताजींनी व्यक्त केली होती. आज आपल्याला तेथे तशी व्यवस्था पाहायला मिळते.

– आधारित (The spirit of Auroville : 79-81)

*

## आजवर दर्शनदिनी देण्यात आलेले संदेश (क्रमशः)

### १५ ऑगस्ट २०००

श्रीअरविंदांनी मानवी देहामध्ये 'अतिमानसिक' चेतना अवतरित केली आहे आणि त्यांनी आपल्याला केवळ अनुसरण करण्याच्या मार्गाचे स्वरूप आणि ध्येयाप्रत पोहोचण्यासाठी आचरणात आणाव्या लागणाऱ्या पद्धतीचे स्वरूपच उघड करून दाखविले आहे असे नाही तर, स्वतःच्या वैयक्तिक साक्षात्काराद्वारे त्यांनी आपल्यासाठी एक उदाहरण घालून दिले आहे; ('अतिमानसिक' चेतना मानवी देहामध्ये अवतरित करणे) ही गोष्ट करता येणे शक्य आहे आणि ती करण्याचा काळ आता आला आहे, याचा पुरावाच त्यांनी आपल्याला दिलेला आहे.

– श्रीमाताजी (CWM 13 : 21)

*

### १७ नोव्हेंबर २०००

तुम्ही जर मनाचेच अनुसरण करत राहिलात तर, तुमच्यासमोर श्रीमाताजी अगदी प्रत्यक्षपणे प्रकट झाल्या तरी ते मन त्यांना ओळखू शकणार नाही. तुमच्या मनाचे नाही तर, तुमच्या आत्म्याचे अनुसरण करा. बाह्य रूपांकडे धाव घेणाऱ्या मनाला न अनुसरता, 'सत्या'ला प्रतिसाद देणाऱ्या आत्म्याचे अनुसरण करा. 'ईश्वरी शक्ती'वर विश्वास ठेवा; ती तुमच्यातील देवसदृश घटकांना मुक्त करेल आणि त्यांना 'दिव्य प्रकृती'च्या अभिव्यक्तीचा आकार देईल.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 26)

*